पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्रमांक - 07252-232134.
ई -मेल:- sp.washim@mahapolice.gov.in.
संकेतस्थळ :- www.washimpolice.gov.in.

क्रमांक :- पोअवा/प्रलि-आस्था/सपोउपनि-पदोन्नती/ 8516/2023 वाशिम, दिनांक :- 24 OCT 2023

## आदेश

खालील नमुद पोलीस हवालदार यांना सहायक पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती देण्याकरीता पदोन्नती Departmental Promotion Committee समीतीने पात्र ठरविले आहे.सदर पोलीस हवालदार यांना **वेतन मॅट्रीक्स-10-29200-92300/-मध्ये** सदरचे आदेश पारीत झाल्याचे दिनांकापासुन तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार **सहायक पोलीस उपनिरीक्षक** या पदावर पदोन्नती देण्यात येत आहे. त्यांनी पदोन्नती स्विकारल्याची तारीख विनाविलंब या कार्यालयास कळवावी.

| अ.क्र | पदनाम | ब.नं. | अमलदारांचे नांव | नेमणूक | पदोन्नती प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोहवा | ३५३ | प्रकाश गुलाब चव्हाण | कारंजा ग्रामीण | जेष्ठतेनुसार |
| २ | पोहवा | ६९५ | राजकुमार बजरंग चौबे | वाशिम शहर | जेष्ठतेनुसार |

वर नमूद केलेल्या तात्पुरत्या पदोन्नतीच्या आदेशाधिन असलेल्या पोलीस हवालदार यांचे विरुध्द आता गुन्हा दाखल झाला असेल/निलंबनाची कार्यवाही केली असेल/विभागीय चौकशी प्रलंबीत असेल/सौम्य शिक्षेची अंमलबजावणी अद्याप सुरु झालेली नसेल/न्यायालयीन प्रकरण प्रलंबीत असेल,किंवा ते एखादी शिक्षा भोगत असेल तसेच त्यांनी जाती दावा वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्याचे निदर्शनास आल्यास नमुद पोलीस हवालदार यांना सदरची पदोन्नतीबाबत पुढील योग्यती कार्यवाही करण्यात येईल या अटीवर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

सदरचे आदेश सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब,दि.07/05/2021 मध्ये दिलेल्या सुचनेनुसार व राज्य शासनाने मा.सर्वोच्य न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचीका क्र.28306/2017 मधील मा.सर्वोच्य न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन यापुढे पदोन्नतीच्या कोटयातील असलेली सर्व रिक्त पदे दि.25/05/2004 रोजीच्या सेवाजेष्ठतेच्या स्थितीनुसार केवळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेने भरण्याबाबत निर्देश असल्याने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर पदोन्नती ही,संपुर्णत: तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने मा.सर्वोच्य न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 मधील निर्णयाच्या आधिन राहुन देण्यात येत असल्याने न्यायनिर्णय व शासनाचे आदेशानुसार दिलेली पदोन्नती कोणत्याही वेळी रदद् करुन मुळ पदावर पदावनत करण्यात येईल.

तसेच वर नमुद पोलीस नाईक यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक एसआव्ही 2015/प्र.क्र.303/का.12,तारीख 12/09/2016 अन्वये जे पोलीस अंमलदार पदोन्नती नाकारणार आहेत, अशा अंमलदारांना दोन वर्षापर्यंत त्यांना त्यांचे पदोन्नती करीता विचार करण्यात येणार नाही तसेच ज्या अंमलदाराने कायमस्वरुपी पदोन्नती नाकारलेली आहे, त्यांचा पुढील कोणत्याही निवडसुचीकरीता विचार करण्यात येणार नाही.

महाराष्ट्र शासन ,शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक पीवाय 1082/सीआर/1100(2)/एसईआर-3 दिनांक 06/11/1984 अन्वये पदोन्नती नंतरच्या पदावर वेतन निश्चिती करण्याबाबत विकल्प दयावयाचा असेल तो पदोन्नती दिल्याचे दिनांकापासुन 01 महीण्याचे आत या कार्यालयास सादर करावा.वेतन निश्चिती करीता दयावयाचा विकल्प 01 महीण्याच्या आत या कार्यालयास प्राप्त न झाल्यास पदोन्नती पदावरील वेतन निश्चिती म.ना.से (वेतन) नियम 1981 मधील नियम 11 (1)(ए) अन्वये पदोन्नतीचा दिनांक विचारात घेवुन कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ज्या पोलीस हवालदार यांना सदरची पदोन्नती स्विकारावयाची नाही त्यांनी तसा विनंती अर्ज सात दिवसाचे आत प्रभारी अधिकारी यांचे मार्फतीने या कार्यालयास सादर करावा.

**वर नमुद पोलीस हवालदार यांचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती झाल्याबद्दल आमचे तर्फे अभिनंदन करण्यात येत आहे. पदोन्नती झालेले नमुद पोलीस अंमलदार हे चांगल्या प्रकारे काम करुन पोलीस दलाचे नांव लौकीक करतील आम्ही अशी आशा बाळगून पुढील कार्यास शुभेच्छा देत आहोत.**

( बच्चन सिंह )
पोलीस अधीक्षक,वाशिम.

**प्रति** :- ठाणेदार,वाशिम शहर,कारंजा ग्रामीण/पो.मुख्या.वाशिम
2/-नमूद पोहवा. यांची सपोउपनि.पदावर पदोन्नती स्विकारल्याची नोंद स्टेशन डायरीत घेवून या कार्यालयास कळवावे.

**प्रतिलिपी** :-
अपर पोलीस अधीक्षक/आस्थापना शाखा-2,3 व 6 /वेतन लिपीक/डिपीजी लिपीक.

**प्रत सविनय सादर** :- मा.विशेष पोलीस महानिरीक्षक,अमरावती परिक्षेत्र,अमरावती.

Scanned with OKEN Scanner